महानिर्मिती

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

एस्ट्रेला बॅटरीज एक्स्पॉन्शन कंपाऊंड इमारत, तळमजला, लेबर कॅम्प,धारावी रोड, माटुंगा,मुंबई-४०० ०१९

क्र.महानिर्मिती/मासं-सेप्र/ 7671 दिनांक: 22.08.2022

# अधिसूचना

**"सहाय्यक कल्याण अधिकारी"(Assistant Welfare Officer) या पदाच्या ऑनलाईन परीक्षा दिनांक, ऑनलाईन परीक्षेच्या प्रवेशपत्राची लिंक व माहितीपत्रक**

**संदर्भ:-** १) महानिर्मिती जाहिरात क्र.०८/२०२१

२) महानिर्मिती अधिसूचना क्र.६००८ दि.०४.०७.२०२२

महानिर्मिती कंपनीतर्फे जाहिरात क्र.०८/२०२१ अन्वये "सहाय्यक कल्याण अधिकारी" (Assistant Welfare Officer) यांची पदे सरळसेवा प्रवेशाव्दारे भरण्याकरीताची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यास अनुसरुन उमेदवारांनी जाहिरातीत नमूद पूर्वावश्यकतेनुसार अर्ज सादर केले होते. उमेदवारांनी अर्जामध्ये सादर केलेली माहिती तसेच सोबत जोडलेले प्रमाणपत्र / कागदपत्रांच्या अनुषंगाने महानिर्मिती अधिसूचना क्र.६००८ दि.०४.०७.२०२२ अन्वये "सहाय्यक कल्याण अधिकारी" (Assistant Welfare Officer) या पदाच्या ऑनलाईन परीक्षेकरीता "पात्र" व "अपात्र" उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच सदरील अधिसूचनेत "सहाय्यक कल्याण अधिकारी" (Assistant Welfare Officer) पदाच्या ऑनलाईन परीक्षेचा अभ्यासक्रम नमूद केला होता.

आता, "सहाय्यक कल्याण अधिकारी" (Assistant Welfare Officer) पदासाठी वर नमूद केल्याप्रमाणे पात्र उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा दि.१०.०९.२०२२ रोजी पार पाडण्यात येणार आहे. उमेदवारांनी ऑनलाईन परीक्षेकरीताचे प्रवेशपत्र प्राप्त करुन घेण्यासाठी खालील ठिकाणी क्लिक ↵ करावे.

**ऑनलाईन परीक्षेकरीताच्या प्रवेशपत्राची लिंक** ↵

तसेच उमेदवारांनी ऑनलाईन परीक्षेबाबतचे माहितीपत्रक प्राप्त करुन घेण्यासाठी खालील ठिकाणी क्लिक ↵ करावे.

**ऑनलाईन परीक्षेबाबतचे माहितीपत्रक** ↵

१) उमेदवारांनी अर्जात सादर केलेली माहिती तसेच अर्जासोबत जोडलेले प्रमाणपत्र / कागदपत्रांच्या प्रतीच्या अनुषंगाने प्राथमिक पडताळणीनंतर पात्र ठरलेल्या उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा घेण्यात येत आहे. तथापि, अर्जात नमूद केलेली कागदपत्रे /प्रमाणपत्रे भविष्यात जमा करण्याच्या प्रक्रिये दरम्यान सादर करणे तसेच सिध्द करण्याची जबाबदारी संपूर्णत: उमेदवाराची राहील. तसेच अर्जात नमूद माहिती उमेदवार सिध्द न करु शकल्यास अथवा खोटी आढळल्यास भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यात उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

२) वरील ऑनलाईन परीक्षेत उमेदवाराच्या नावाचा समावेश आहे म्हणून नेमणूक देण्याबाबतचा कोणताही हक्क उमेदवारांना राहणार नाही.

३) महानिर्मिती प्रशासकीय परिपत्रक क्र.५०२ दि.१७.०८.२०२२ नुसार सरळसेवा प्रवेशाव्दारे प्रसिध्द करण्यात येणाऱ्या पदांकरीता मागास प्रवर्गातून (Backward Class) अंतिम निवडी करीता एकूण गुणांपैकी किमान २०% गुण व खुल्या प्रवर्गातून (Open Category) अंतिम निवडीकरीता एकूण गुणांपैकी किमान ३०% गुण मिळविणे आवश्यक आहे, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

४) ऑनलाईन परीक्षेतील गुणांच्या आधारे केवळ वैयक्तिक मुलाखत परीक्षेच्या यादीत उमेवारांच्या नावाचा समावेश आहे म्हणून नेमणूक देण्याबाबतचा कोणताही हक्क उमेदवारांना राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

कार्यकारी संचालक (मासं)
महानिर्मिती

H:\Madhuri backup 22072020\D\RC-2018\2018\03.03.2018\ADVERTISEMENT\Advt.2021\Advt.No.8-2021 AMO & Othr\Notification-AWO.doc